खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२१ – २२

### प्रा. पायल ओसवाल यांना पीएच.डी.पदवी निमित्त अभिनंदन

लोकमत



## ओसवाल यांचा पीएचडी मिळाल्याबद्दल सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरूनगर : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील प्रा. पायल ओसवाल यांना नुकतीच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली.

प्रा. पायल ओसवाल यांनी 'पुणे जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांची प्रगती, समस्या व आव्हाने- एक विश्लेषणात्मक अभ्यास' या विषयावर संशोधन केले. त्यांना साहेबरावजी बुट्टे-पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी मार्गदर्शन केले. प्रा. पायल ओसवाल यांच्या यशाबद्दल संस्थेच्यावतीने त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. प्रा. पायल ओसवाल यांचे संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांच्यासह उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे आदींनी अभिनंदन केले.

Hello Pune Gramin
Page No. 5 Jul 20, 2021
Powered by: erelego.com

वर्ष ६५ दैनिक संध्या नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
बुधवार, २१ जुलै २०२१

# प्रा. पायल ओसवाल यांना पीएच.डी. प्राप्त



**राजगुरूनगर (दै. संध्या) :** येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील प्रा. पायल ओसवाल यांना नुकतीच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पीएच.डी.पदवी प्रदान करण्यात आली.

प्रा.ओसवाल यांनी 'पुणे जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांची प्रगती, समस्या व आव्हाने – एक विश्लेषणात्मक अभ्यास' या विषयावर संशोधन केले. त्यांना साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच.एम.जरे यांनी मार्गदर्शन केले. प्रा. ओसवाल यांच्या यशाबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी बोलताना संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी त्यांचे कौतुक करताना त्या खेड तालुक्यातील जैन समाजातील पहिल्या महिला डॉक्टरेट असल्याचे गौरवोद्गार काढले. त्यांचे पीएच.डी.चे संशोधन सहकारी साखर कारखानदारीसमोरील समस्यांचा अभ्यास तसेच त्यांची ध्येयधोरणे ठरविण्यासाठी उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

प्रा. ओसवाल यांच्या यशाबद्दल संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्यासह उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर व सर्व संचालक मंडळ, प्राचार्य डॉ. व्ही.डी.कुलकर्णी, उपप्राचार्य प्रा.एस.एन. टाकळकर, उपप्राचार्य डॉ.संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

वर्ष : १४०
Regd.No. PCW/002/2018-2020-S.P.College Post-RNI No. 1755/57
केसरी
राष्ट्रीय ठेवा
• अंक ३३२ • पृष्ठे : १०+छाया पुरवणी • पाच रुपये • शनिवार १२ डिसेंबर २०२०, पुणे C (पुणे/अहमदनगर/सोलापूर आवृत्ती)

# प्रा. पायल ओसवाल यांना पीएच.डी.



**राजगुरूनगर, (वार्ताहर) :** येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील प्रा. पायल ओसवाल यांना नुकतीच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली.

प्रा. ओसवाल यांनी 'पुणे जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांची प्रगती, समस्या व आव्हाने–एक विश्लेषणात्मक अभ्यास' या विषयावर संशोधन केले. त्यांना साहेबरावजी बुट्टे-पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी मार्गदर्शन केले.

प्रा. ओसवाल यांच्या यशाबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी बोलताना संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे–पाटील यांनी त्यांचे कौतुक करताना त्या खेड तालुक्यातील जैन समाजातील पहिल्या महिला डॉक्टरेट असल्याचे गौरवोद्गार काढले.

प्रा. ओसवाल यांच्या यशाबद्दल संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे–पाटील यांच्यासह उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर व सर्व संचालक मंडळ, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, उपप्राचार्य प्रा.एस.एन. टाकळकर, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

नवराष्ट्र

# प्रा.पायल ओसवाल यांना पीएच.डी.

राजगुरूनगर. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील प्रा. पायल ओसवाल यांना नुकतीच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. ओसवाल यांनी 'पुणे जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांची प्रगती, समस्या व आव्हाने - एक विश्लेषणात्मक अभ्यास' या विषयावर संशोधन केले. त्यांना साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी मार्गदर्शन केले. प्रा. पायल ओसवाल यांच्या यशाबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी बोलताना संस्थाध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी त्यांचे कौतुक करताना खेड तालुक्यातील जैन समाजातील पहिल्या महिला डॉक्टरेट असल्याचे गौरवोद्गार काढले. त्यांचे पीएच.डी.चे संशोधन सहकारी साखर कारखानदारीसमोरील समस्यांचा अभ्यास तसेच त्यांची ध्येयधोरणे ठरविण्यासाठी उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

Pune Plus Edition
21 July 2021 Page No. 2
epaper.navarashtra.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख